जिल्हा व सत्र न्यायालय,जळगांव.
फेर जाहीर निविदा.

जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव व जिल्हा न्यायालयाचे अखत्यारीत असलेल्या न्यायालयांना डेझर्ट व फायबर कुलर खरेदी करावयाचे असल्याने सदर पुरवठाकारांना या जाहीर निविदेद्वारे कळविण्यात येते की, डेझर्ट व फायबर कुलर खरेदी करणेकामी ज्या पुरवठाकारांना स्वारस्य असेल त्यांनी त्यांची दरपत्रके बंद लिफाफयात म. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव या नावाने पाकिटावर "डेझर्ट व फायबर कुलर चे दरपत्रक" असे नमुद करुन पाकीटे म.प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव यांचे कक्ष क.101 मध्ये दिनांक 22/06/2026 पर्यत कार्यालयीन वेळेत व कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सादर करावीत अथवा समक्ष आणून द्यावीत. त्यानंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही. दरपत्रके दिनांक 23/06/2026 रोजी म.जिल्हा न्यायाधीश–1, जळगांव यांचे समक्ष त्यांच्या निजी कक्षात उघडले जातील.

कार्यालयीन उपयोगाकरीता लागणारे डेझर्ट व फायबर कुलर खालील प्रमाणे उधारीवर खरेदी करावयाची आहेत.

अ.नं.	खरेदी करावयाच्या वस्तु व तपशील	संख्या
1	डेझर्ट व फायबर कुलर (3.5 ft cooler,water tank capacity 100 ltrs., Speed 3 with 4 way air deflection, Turf Body, Dust resistant body along with alluminium fan, Capsule copper winded motor with long lasting capacity)	81

सर्वसाधारण अटी.

१	दरपत्रक स्विकृत केल्यावर आदेश दिल्यानंतर सदरचे साहित्य त्वरीत पुरवावे. सदरील साहित्याचा दर्जा उत्कृष्ट आणि उच्च प्रतीचा असावा, नसल्यास स्विकाराला जाणार नाही.
२	सदरचे साहित्य कार्यालयीन वेळेत जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव तसेच जिल्हा व सत्र न्यायालयाचे अधिपत्याखालील सर्व तालुका न्यायालयात स्वखर्चाने पोहोचवून द्यावे लागेल.
३	दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकारणेचा संपुर्ण अधिकार मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सो., जळगांव यांच्याकडेस राखून ठेवण्यात आलेला आहे. दरपत्रक भरतांना दर अंकात व अक्षरी असे दोन्ही प्रकारे भरावेत.
४	सदरील साहित्य कार्यालयात पोहोचवून दिल्यावर उधारीचे देयक तीन प्रतीत सादर करावे.
५	दरपत्रक भरतांना सर्व करांसह दरपत्रक भरावे. मात्र जीएसटी टॅक्स असल्यास त्याचा स्वतंत्र दर नमुद करावा. त्याचवेळी महाराष्ट्र शासनास पुरवठा केल्यास तरतुदीप्रमाणे सुट दिली जाते. त्या अटीस अधीन राहून दरपत्रक द्यावे लागेल तसेच बीलाची रक्कम अदा करतांना नियमानुसार टी.डी.एस. कपात करण्यात येईल.
६	उपरोक्त साहित्य अनुदानाअभावी कमी जास्त प्रमाणात खरेदी करण्याचे अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सो., जळगांव यांच्या कडेस राखून ठेवण्यात आलेले आहेत. उपरोक्त कुलर उधारीवर खरेदी करावयाचे आहेत. तसेच सदर बीलाची रक्कम अनुदान उपलब्धतेनुसार देण्यात येईल.

७	दरपत्रक उघडण्याच्या दिवशी व नमुद वेळी दरपत्रक पाठविणा—यांनी प्रत्यक्ष हजर रहावे अथवा आपला प्रतिनिधी पाठवावा अन्यथा त्यांच्या गैरहजेरीत दरपत्रक उघडणेत येतील.
८	दरपत्रकातील दर दिनांक ३१/१२/२०२६ अखेर कार्यरत राहतील. अगर त्यानंतरही त्याच दरात पुरवठा केला जाईल, त्या कालावधीचा खुलासा स्पष्ट करावा.
९	नमुद वस्तूंचा पुरवठा आदेश देवूनही मुदतीत पुरवठा न केल्यास पुरवठा आदेश रद्द करण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव यांनी राखून ठेवला आहे.
१०	पुरवठा करण्यात येणा—या कुलरच्या वरच्या भागाच्या उजव्या कोप—यात व टपवर या कार्यालयाकडुन पुरविण्यात येणारे नाव व नंबर सदरील कुलरवर रंगाने टाकुन द्यावे लागेल.

म.जा.क.रोखशाखा/3802/2026
जिल्हा व सत्र न्यायालय,जळगांव
दिनांकः 11/06/2026.

प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय,
जळगांव

प्रत माहिती करीता व नोटीस बोर्डावर प्रसिध्दी करीता.

1. म.जिल्हाधिकारी,जळगांव.
2. म.तहसिलदार,जळगांव.
3. म.दिवाणी न्यायाधिश व.स्तर,जळगांव.
4. जिल्हा व सत्र न्यायालय,जळगांव.
5. मुख्य न्यायदंडाधिकारी,जळगांव.
6. जिल्हा न्यायालय, जळगांव संकेतस्थळावर ✓